International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 January – February 2023

# महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासातील वाढती प्रादेशिक विषमता : एक गंभीर समस्या

**डॉ.शिवाजी झांझुरणे**
*सहा.प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.*
*Corresponding Author -* डॉ.शिवाजी झांझुरणे
**E-mail -** shivajizanzurne@gmail.com
**DOI - 10.5281/zenodo.7775585**

**प्रस्तावना (Introduction):**

ऐतिहासिक व भौगोलिकदृष्ट्या अनुकूल कारणांमुळे महाराष्ट्र राज्य हे निर्मितीपासूनच आर्थिक आणि विशेषता औद्योगिकदृष्ट्या भारतातील इतर सर्व राज्यांपेक्षा प्रगत राज्य राहिले आणि आजही ते स्थान कायम आहे. परंतु याच प्रगत महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र हे अनेक समस्यांनी ग्रस्त व येथील शेतकरी विविध समस्यांनी त्रस्त असल्याचे दिसते. त्यातीलच एक समस्या म्हणजे कृषी विकासातील वाढती प्रादेशिक विषमता ही होय. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेतीचे योगदान कमी होत जाणे हा जागतिक आर्थिक विकासाचा इतिहास आहे. परंतु इतर विकसित देशांप्रमाणे शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होण्याबरोबरच शेतीतील कामगार व व शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांचे प्रमाण देशात व महाराष्ट्रातही लक्षणीय दृष्ट्या कमी झालेले नाही. उदाहरणार्थ १९६०-६१ मध्ये राज्याचे एकूण वास्तव उत्पन्न 2250 कोटी होते .त्यामध्ये शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे 26 टक्के, २४ टक्के आणि 50 टक्के होता. 2019 - 20 मध्ये राज्याचे चालू किमतीमध्ये उत्पन्न अंदाजे 28 लाख 78 हजार कोटी होते. मात्र शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे १० टक्के, ३२ टक्के आणि 58 टक्के झाला. शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या आजही 56 टक्क्यांच्या आसपास आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून भारताप्रमाणेच महाराष्ट्रामध्ये सुद्धा कृषीला महत्त्वाचे स्थान आहे .कारण महाराष्ट्रातील जवळपास 56 टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे .

महाराष्ट्रामध्ये कृषी हे एकमेव क्षेत्र असे आहे की त्यातून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण लोकांना रोजगार उपलब्ध होतो. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेची भिस्त खऱ्या अर्थाने शेतीवरच अवलंबून आहे. एकूणच, ग्रामीण जनतेच्या दृष्टीने शेती हेच उपजीविकेचे हे प्रमुख

साधन आहे. मात्र अलीकडील काळात महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचे स्थूल राज्य उत्पन्नातील योगदान दिवसेंदिवस कमी होऊ लागल्याचे दिसून येते. हे योगदान कमी होण्यामागीलचे जी कारणे सांगितले जातात त्यामध्ये कृषीसाठी आवश्यक असलेल्या वातावरणात दिवसेंदिवस होणारा प्रतिकूल बदल हे एक प्रमुख कारण होय. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचा प्रभाव कमी होऊन उद्योग व सेवा क्षेत्राचा विशेषता सेवा क्षेत्राचा प्रभाव वाढत असल्याचे दिसते. सन 2022 च्या आकडेवारीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात या दोन्ही क्षेत्रांचा एकत्रित हिस्सा सुमारे 88.1 टक्के आहे .या उलट राज्यातील सुमारे 56 टक्के लोकसंख्या ज्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे त्या कृषी क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा केवळ 11.9 टक्के एवढाच आहे.

म्हणजेच महाराष्ट्रातील कृषी विकास समाधानकारक तर नाहीच. परंतु जो कृषी विकास झाला त्यामध्येही पुन्हा राज्याच्या वेगळ्या विभागात विकासाच्या दृष्टीने विषमता निर्माण झाली आहे .अशा प्रकारच्या प्रादेशिक विषमतेचा विपरीत परिणाम राज्यातील जनतेच्या समन्वयाच्या व एकात्मतेच्या भावनावर होतअसततो. म्हणून महाराष्ट्रात आर्थिक सुबत्ता व स्वावलंबन आणण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास घडवून आणणे तर आवश्यक आहेच. परंतु त्या विकासाची फळे समाजातील सर्वांपर्यंत पोहोचावेत यासाठी प्रादेशिक विषमता कमी करून समतोल प्रादेशिक विकास कसा साधता येईल याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील शोध निबंधाअंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासातील प्रादेशिक विषमता, तिचं स्वरूप, कृषी विकासात प्रादेशिक विषमता निर्माण होण्याची कारणे व ते कमी करण्यासाठीच्या उपाययोजना इत्यादी घटकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research):**

१.महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासातील प्रादेशिक विषमतेचा अभ्यास करणे.

२. कृषी विकासात प्रादेशिक विषमता निर्माण करणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

३. कृषी विकासातील प्रादेशिक विषमतेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

४. कृषी विकासातील प्रादेशिक विषमता कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे

**गृहीत (Assumption):**

महाराष्ट्रातील कृषी विकास समतोल नसून त्यामध्ये प्रादेशिक विषमता आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुतशोधनिबंध हा (**"महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासातील वाढती प्रादेशिक विषमता:एक गंभीर समस्या"**) प्रामुख्याने दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे .यासाठी प्रामुख्याने महाराष्ट्राचे आर्थिक पाहणी अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ ,लेख, मासिके, साप्ताहिके इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे .

**प्रादेशिक विषमतेची संकल्पना:**

"तुलनात्मकदृष्ट्या विकसित आणि आर्थिक दृष्टिकोनातून मागासलेल्या राज्यांचे सहअस्तित्व आणि प्रत्येक राज्यांचे विविध क्षेत्रांमध्ये विकासाच्या दृष्टिकोनातून भिन्नतेस प्रादेशिक विषमता असे म्हणतात."भारतात1951पासून राष्ट्रीय नियोजनास सुरुवात झाली व सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये समतोल प्रादेशिक विकासाचे उद्दिष्टे फलद्रप करण्याचे ठरविले. तसेच प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्याचे प्रयत्न अनेक व्यक्ती, संस्था व शासनाने नियुक्त केलेल्या समित्यांनी केला आहे, परंतु समतोल प्रादेशिक विकास साधला का? तर नाही. याउलट त्यामध्ये वाढ होत गेली. याचे मुख्य कारण म्हणजे शासकीय यंत्रणा व प्रयत्न अपुरे पडले .परिणामतः जवळपास 72 वर्षांच्या नियोजनाने श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब गरीबच राहिल्याचे चित्र देशात दिसून येते. त्याचप्रमाणे जे प्रदेश विकसित होते ते अधिक विकसित झाले व जे प्रदेश मागासलेले होते ते अधिक मागासलेले. गरीब श्रीमंतांमधील दरी जशी रुंदावत गेली त्याचप्रमाणे प्रगत व मागासलेले प्रदेश यांच्यातीलउत्पन्नाची दरी वाढत गेली .आर्थिक विकासाच्या मागील कित्येक वर्षांच्या प्रक्रियेमध्ये जे प्रदेश प्रगत समजले जातात त्यांच्याकडेच आर्थिक सुभत्त्येचा व संपन्नतेचा प्रवाह व्हायला तर मागास भागात तो झिरपला देखील नाही. विसन्न करणारी ही परिस्थिती अधिक बळावू नये यासाठी शासनाने काही प्रयत्न केले हे निर्विवाद सत्य आहे. तथापि अजूनही प्रादेशिक व समतोल हा कळीचा व गंभीर प्रश्न आहे.

**कृषी क्षेत्रातील प्रादेशिक विषमता:**

"सामान्यता तुलनात्मक कृषीची उत्पादकता, उत्पादन आणि त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती यामध्ये प्रदेशा- प्रदेशामध्ये, राज्या- राज्यांमध्ये असणाऱ्या कृषी क्षेत्रातील प्रादेशिक विषमता असे म्हणतात."

**महाराष्ट्र राज्याच्या कृषी विकासातील प्रादेशिक विषमतेचे स्वरूप:**

महाराष्ट्र राज्याची स्थापना एक मे 1960 रोजी झाली व कोकण मराठवाडा विदर्भ आणि

पश्चिम महाराष्ट्र अशा चार विभागात हे राज्य विभागले गेले त्यामुळे प्रादेशिक विषमतेचा विचार करताना या चार प्रमुख विभागांची तुलना करून कृषी क्षेत्रातील प्रादेशिक विषमतेचे स्वरूप आपणास पुढील घटकांच्या आधारे पाहता येईल

**1.विभागनिहाय जलसिंचनाची स्थिती:**

शेतीमध्ये जलसिंचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी शरीराला जशी रक्ताची गरज असते तसेच शेतीला पाण्याची गरज असते. कृत्रिम पाणी पुरवठ्याला जलसिंचन असे म्हणतात. स्थितीला पाणीपुरवठा झाला तर विकासात गती मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील, उत्पन्नात वाढ होईल. परिणामतः भांडवल निर्मिती अधिकाधिक होऊ लागेल, पाणीपुरवठ्यामुळे एकाच शेतीमधून दोन किंवा त्यापेक्षा अधिक पिके घेता येणे शक्य होईल आणि दरडोई उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल. जलसिंचनाचे हे सर्व महत्त्व असताना ठिबक सिंचन आणि स्प्रिंकलर वापर प्रमाणाची विभागनिहाय काय स्थिती आहे आहे हे तक्ता क्रमांक १. मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक १.**

**ठिबक सिंचन आणि स्पिंकलर वापराची विभागनिहाय स्थिती:(सन 2020 - 21)**

| विभाग | ठिबक सिंचनाखालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) | स्प्रिंकलरसिंचनाखालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) | एकूण (हेक्टर) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| कोकण | 12842.19 | 280.35 | 13122.53 | 0.70 |
| पश्चिम महाराष्ट्र | 852297.85 | 100067.54 | 952365.39 | 50.47 |
| मराठवाडा | 324944.90 | 135579.64 | 460524.55 | 24.40 |
| विदर्भ | 175915.06 | 285110.47 | 461025.53 | 24.43 |
| **एकूण** | **1366000.00** | **521038.00** | **1887038.00** | **100.00** |

**Source:** Directorate of Horticulture, Maharashtra State, Pune

तक्ता क्रमांक १. वरून असे स्पष्ट होते की राज्याच्या एकूण ठिबक व स्पिंकलर जलसिंचन क्षेत्रापैकी एकट्या पश्चिम महाराष्ट्रात अर्ध्यापेक्षा अधिक म्हणजेच 50.47 टक्के इतके जलसिंचनाखालील क्षेत्र आहे. तसेच मराठवाडा आणि विदर्भातील ठिबक व स्पिंकलर सिंचनाची स्थिती सारखीच म्हणजे अनुक्रमे 24.40 टक्के व 24.43 टक्के अशी आहे .तर कोकण विभागामध्ये ठिबक आणि स्पिंकलर वापराचे प्रमाण 1टक्के पेक्षाही कमी (0.70 टक्के ) असल्याचे आढळते.

**2.विद्युत वापर:**

अलीकडे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विद्युत हे साधन महत्त्वाची भूमिका बजावते .विविध कृषी कामे हे विजेच्या साह्यानेच पार पाडले जातात. त्यामुळे कृषी क्षेत्रातील विभागनिहाय विद्युत वापराची स्थिती काय आहे हे तक्ता क्रमांक २. मध्ये दर्शविले आहे .

**तक्ता क्रमांक २.**

**विद्युत वापर**

| **विभाग** | **विजेचा कृषी वापरातील वाटा (टक्के)** | | **सकल पिकाखालील क्षेत्राचा प्रति हेक्टरी वापर (किलो वट मध्ये )** | |
|---|---|---|---|---|
| | 2015-16 | 2020-21 | 2015-16 | 2020-21 |
| कोकण | 2.07 | 2.50 | 4689.06 | 7035.19 |
| पश्चिम महाराष्ट्र | 53.46 | 57.89 | 1048.19 | 1926.66 |
| मराठवाडा | 24.13 | 23.22 | 407.62 | 771.75 |
| विदर्भ | 2.33 | 16.39 | 786.1 | 1265.63 |
| **एकूण राज्य** | **100.00** | **100.00** | **6931.06** | **10999.23** |

**Source:** Stastical Abstract of Maharashtra, Relevant Issues.

वरील तक्ता का क्रमांक २. वरून शेतीसाठी वापरात येणाऱ्या विद्युत शक्तीच्या उपभोगात सूक्ष्म विषमता असल्याचे दिसून येते. कृषीतील विद्युत शक्तीचा वापर सर्व प्रदेशांमध्ये वाढत जाण्याची प्रवृत्ती जरी दिसून येत असली तरी राज्याच्या एकूण शेती संबंधातील वापर आणि प्रती हेक्टर (पिकाखालील क्षेत्र) उपभोगातील वाटा हा इतर प्रदेशाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्राचा जास्त आहे. सन 2015-16 मध्ये एकूण कृषी संबंधीच्या उपभोगांपैकी पश्चिम महाराष्ट्राचा वाटा 57.89 टक्के तर मराठवाडा आणि विदर्भ यांचा वाटा अनुक्रमे 23.22 टक्के व 16.39 टक्के असल्याचे आढळते. तसेच शेतीसंबंधी वापरण्यात येणाऱ्या विद्युत शक्तीसाठी सरसकट दराच्या तरतुदीद्वारे शासकीय आर्थिक सहाय्य पुरविले जाते .पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विद्युत वापर जास्त असल्यामुळे आर्थिक साह्याचा फायदा देखील सर्वात जास्त त्यांनाच मिळतो.

**3.विभागनिहाय पिक पद्धती:**

कृषी विकासातील प्रादेशिक विषमता पाहत असताना विभागनिहाय पिक क्षेत्राखालील वाटा किती आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक पद्धतीची विभागनिहाय माहित तक्ता क्रमांक ३. मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ३.**

**प्रमुख पिकाखालील क्षेत्राचा प्रदेशनिहाय वाटा: (प्रतिशत).**

| **विभाग** | **खाद्यांन** | **ऊस** | **कापूस** |
|---|---|---|---|
| कोकण | 4.18 | 0.04 | 0.00 |
| पश्चिम महाराष्ट्र | 43.84 | 75.53 | 13.74 |
| मराठवाडा | 28.58 | 20.82 | 32.14 |
| विदर्भ | 23.39 | 3.61 | 54.13 |
| **एकूण राज्य** | **100.00** | **100.00** | **100.00** |

**Source**: Season and Crop Report of Maharashtra

वरील तक्ता क्रमांक ३वरून असे दिसून येते की राज्यातील खाद्यांन पिकाखालील क्षेत्रापैकी कोकणाचा वाटा केवळ 4.37 टक्के पश्चिम महाराष्ट्र 43.84 टक्के मराठवाडा 28.58 टक्के तर विदर्भ 23.39 टक्के आहे .तर ऊस आणि कापूस या नगदी पिकांचा विचार करता असे दिसते की, ऊस या पिकाखालील राज्यातील जे एकूण क्षेत्र आहे त्या क्षेत्रापैकी 75 टक्के पेक्षाही जास्त (75.53 टक्के) वाटा एकट्या पश्चिम महाराष्ट्राचा आहे. तर विदर्भ आणि कोकणामध्ये ऊसाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. कापूस या नगदी पिकाचा विचार करता विदर्भ आणि मराठवाडा या दोनच विभागाचा वाटा राज्यातील कापसाखालील एकूण क्षेत्रापैकी 85 टक्के पेक्षा जास्त आहे व हे पीक अनिश्चित व लहरी पावसावर अवलंबून आहे .त्यामुळे या विभागातील विशेषता विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मागील पीक नुकसान हेच प्रमुख कारण असल्याचे अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे.

**कृषी विकासामध्ये प्रादेशिक विषमता निर्माण होण्याची कारणे:** कृषी विकासात प्रादेशिक विषमता निर्माण होण्यास पुढील घटक कारणीभूत ठरतात:

१.**मानवनिर्मित कारणे:**प्रादेशिक विषमता निर्माण होण्यास मानवी करण्याचा मोठा हातभार असतो.२.**नैसर्गिक कारणे:**नैसर्गिक कारणांमध्ये निसर्गाची अनुकूलता, प्रतिकूलता महत्त्वपूर्ण असते. जेथे नैसर्गिक अनुकूलता अधिक असेल (उदा. सुपीक जमीन, पुरेसा पाणीपुरवठा, खनिजांची उपलब्धता इत्यादी इ.) तेथे विकासाची अधिक संभाव्यता असते. मात्र जेथे नैसर्गिक प्रतिकूलता असते तेथे विकासाची संभाव्यता कमी असते.३.आधारभूत संरचनाचे उपलब्धता ४.संयोजन कौशल्य ५.सरकारी दृष्टिकोन ६.भांडवलाची उपलब्धता ७.राजकीय

इच्छाशक्ती: महाराष्ट्रातील राजकीय इच्छाशक्तीने प्रादेशिक विषमता निर्माण होण्यास महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्याचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी मराठवाडा, विदर्भ यासारख्या प्रदेशांकडे दुर्लक्ष केले. महाराष्ट्राचा फार मोठा निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविण्यात आला. ठराविक प्रदेशाचा विकास घडवून आणण्याची कल्पकता स्वार्थी नेतृत्वाने दाखविली.

**कृषी विकासातील प्रादेशिक विषमतेतून निर्माण होणाऱ्या समस्या:**

१. प्रादेशिक विषमतेकडे दुर्लक्ष केल्यास राज्यात विकासाची बेटे निर्माण होण्यास पोषक वातावरण तयार होते व अशी बेटे निर्माण झाल्यास समाजातील इतर घटकांवर अन्याय होतो.

२. तुलनेने कमी विकसित प्रदेशातील लोकांच्या मनामध्ये आपण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून डावलले जात आहोत अशी हीन भावना निर्माण होते. व ते विकसित प्रदेशातील लोकांकडे शत्रुत्वाच्या नजरेने पाहू लागतात. त्यातून आपुलकीची भावना लोप पावते.

3. कृषी विकासातील प्रादेशिक विषमतेमुळे राज्याच्या वेगवेगळ्या प्रदेशातील दरडोई उत्पन्नात देखील विषमता निर्माण होते .

4. दरडोई उत्पन्न व राहणीमानाचा जवळचा समसंबंध असतो. ज्या प्रदेशातील दरडोई उत्पन्न जास्त तेथील राहणीमान उच्च असते. उदा. पश्चिम महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न जास्त असल्यामुळे मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे राहणीमान उच्च असल्याचे आढळते.

**कृषी क्षेत्रातील प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठीच्या उपाययोजना:**

१. **प्रसिद्ध कृषी तज्ञ डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन** यांच्या मते, जमिनीचे एकत्रिकरण आणि समतलीकरण ,शेती करणाऱ्यांना मालकी हक्क, ग्रामीण संचार, ग्रामीण विद्युतीकरण ,एक प्रगतीशील विद्यापीठ इ. परिस्थिती देशातील कोणत्याही भागात निर्माण झाल्यास तेथे हरित क्रांती घडून येईल. वरील स्वामीनाथन यांनी सांगितलेले उपाय जर महाराष्ट्रातील मागास भागातील कृषी क्षेत्रामध्ये राबविले तर महाराष्ट्राच्या मागास भागातील कृषी विषमता नक्कीच कमी होईल .

२. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील दुष्काळ व अतिवृष्टीची जोखीम कमी करण्यासाठी थेरीकरण निधीची स्थापना करण्यात यावी.

३. कोणत्याही प्रदेशाचा विकास हा ऐतिहासिक, भौगोलिक नैसर्गिक बाबींवर अवलंबून असतो. परंतु एखाद्या प्रदेशाला जर या नैसर्गिक बाबी

प्रतिकूल असतील तर त्या प्रदेशाच्या विकासासाठी राज्य शासनाची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ असणे आवश्यक आहे. तसेच विकासाच्या प्रक्रियेत शासनाचा समन्यायी हस्तक्षेप अपेक्षित आहे.

४. विदर्भ व मराठवाड्यात उत्पन्न कमी असण्याचे प्रमुख दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे शेतीतून उत्पादन (त्यामुळे उत्पन्नही) कमी आणि दुसरे म्हणजे शेती खेरीज अन्न क्षेत्रांमधील रोजगार संधी कमी. त्यामुळे कमी उपज असलेल्या, कमी उत्पन्न देणाऱ्या शेतीवरच अधिक लोकसंख्या अवलंबून आहे .

५.पश्चिम महाराष्ट्रात शेतीची उपजत क्षमता अधिक आणि शेतीतून मिळणारेउत्पन्नही जास्त हे या विभागात ग्रामीण भागातील गरिबी कमी आणि उत्पन्न अधिक असण्याचे कारण आहे

**सारांश:**

वरील सर्व विवेचनावरून महाराष्ट्रात कृषी क्षेत्रातील प्रादेशिक असमतोलाचा किंवा प्रदेश निहाय कृषी विकासातील विषमतेचा प्रश्न गंभीर आहे असे दिसून येते .राज्यातील पश्चिम महाराष्ट्र हा विभाग कृषी विकासाच्या प्रक्रियेत इतर विभागाच्या तुलनेत अधिक आघाडीवर राहिलेला आहे. याचे कारण असे की पश्चिम महाराष्ट्रातील कृषी संबंधीच्या अर्थप्रक्रिया या पुष्प संवर्धन, फळबाग, अन्नप्रक्रिया या बाबींना राज्याच्या सहकार्याने पूर्णत्व देऊन जागतिक बाजारपेठेशी जुळून घेतलेले आहे. त्याचप्रमाणे या प्रदेशातील आर्थिक बदल आणि कृषी संबंधीच्या अर्थप्रक्रिया, माहिती तंत्रज्ञान, बँक व विमा या सेवा क्षेत्राशी जोडल्या गेलेले आहेत.तसेच कृषीचे आधुनिकीकरण व कृषी आधारित उद्योगांची स्थापना करण्याकडे जास्त कल राहिलेला आहे.

तर दुसऱ्या बाजूला मराठवाडा व विदर्भ या विभागांनी काही बाबतीत महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या असल्या तरी पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत त्यांचा कृषी विकास हा निम्मा राहिलेला आढळून येतो. तो सुधारण्यासाठी एकीकडे शेतीची उत्पादकता वाढवायची आणि दुसरीकडे औद्योगिक क्षेत्राला ही प्रोत्साहन देऊन त्या क्षेत्रातील रोजगार संधी वाढवायच्या. म्हणजेच उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून राहावे लागणाऱ्यांची संख्या कमी करावी लागेल .त्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यात शेतीसाठी सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे आणि शेतकी तंत्रज्ञान अद्यावत करणे यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागेल. याखेरीज या प्रदेशामधील शहरी तसेच ग्रामीण भागात उत्पादन उद्योग व सेवा उद्योगांची संख्या आणि व्याप्ती वाढवण्याच्या हेतूने पायाभूत सुविधांचे जाळे उभे करावे लागेल. त्यासाठी मोठी गुंतवणूक आवश्यक ठरेल.

**संदर्भसूची:**

1. थोरात सुखदेव (2018) *"प्रादेशिक विषमता: विकासाचे दुखणे कायम",* लेख, दैनिक लोकसत्ता, 1 मार्च 2018

2. मुणगेकर भालचंद्र (2020),*"सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे आव्हान",* लेख, महाराष्ट्र टाइम्स 6 सप्टेंबर 2020

3.सोळुंके आर. एस. (2003)*"महाराष्ट्राची अर्थव्यवस्था",*कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद

.

4.एस. के. मिश्रा व वी. के. पुरी (2009) *"भारतीयअर्थव्यवस्था",*हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई

5. मिश्र जे.पी. (2020) *"कृषी अर्थशास्त्र",*साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा

6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल 2021 -22

7.Economic and political weekly, 7 Feb. 2009